दि. ४ व ५ जुलै,२००६ रोजी अतिवृष्टीमुळे तसेच दि.११ जुलै,२००६ रोजी झालेल्या बॉम्ब स्फोटामुळे दि.१२ जुलै, २००६ रोजी कार्यालयात उपस्थित राहू न शकलेल्या बृहन्मुंबईतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसएसएन १००७/(४२/०७)/माशि-२
मंत्रालय विस्तारभवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ५ मार्च,२००७.

## परिपत्रक

दिनांक ४ व ५ जुलै,२००६ रोजी मुंबईमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व दिनांक ११ जुलै,२००६ रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेवरील उपनगरीय मार्गावर झालेल्या बॉम्ब स्फोटामुळे दिनांक १२ जुलै,२००६ रोजी वाहतूक व्यवस्था बंद पडली. परिणामी बहुसंख्य मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/अध्यापक विद्यालये यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शाळांमधून उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे शासनाने असा निर्णय घेतला आहे की, उपरोक्त दिवशी वाहतूक व्यवस्था बंद पडल्यामुळे मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/अध्यापक विद्यालये यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहू शकले नाहीत, अशा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्या दिवसांची त्यांची गैरहजेरी विशेष नैमित्तीक रजा म्हणून मंजूर करण्यात यावी.

२. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००७०३०५१२३११८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( श्री. भि. होटकर )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य,पुणे.
विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई.
शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर/पश्चिम),मुंबई
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती - कार्यासन -माशि-२

48-E:\Old Data\PANDIT\G...RG.R.42-07-mashi-2